# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालयः हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०० ०१३.
०२२-४३२२६८२५/४३२२६८२६, ई मेल mlwbpro53gmail.com / pro.mlwb-mh@gov.in


---

जा.क्र.मका/ग्रंथालय/२०१८-१९/१८ दिनांक : २५/०५/२०१८

परिपत्रक :

**विषय : शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र शिक्षण वर्ग**

**संदर्भ** : शासन निर्णय क्र.एलआयबी १०९१/१५४७८०/(२५३४)संस्कृती-४ दि.१९.८.१९९१

उपरोक्त संदर्भानुसार, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे चालविण्यात येणारा **ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम** हा ग्रथालय संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा अभ्यासक्रमाशी समकक्ष समजण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी, प्रत्यक्ष कार्यानुभव, विषयांची यादी, परीक्षा पद्धती इ. बाबी विचारात घेऊन शासनाने सदर मान्यता दिलेली आहे.

त्यानुषंगाने मंडळातर्फे दरवर्षी **शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र शिक्षण वर्गाचे** आयोजन राज्यातील विविध केंद्रांत प्रतिसादानुसार केले जाते. दरवर्षी माहे जुलै / ऑगस्टमध्ये सदर वर्ग सुरु केले जातात. सदर वर्ग सुरु करताना संबंधित ग्रंथालयीन कर्मचारी व केंद्र संचालक तसेच अधिका-यांना पुरेसा अवधी मिळावा, या हेतूने खालील तपशिलाप्रमाणे नियम व अटींचा समावेश असलेले स्थायी आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. गट कार्यालयाने मंडळाच्या नियम अटी विचारात घेऊन विभागीय कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा. त्यास विभागीय कार्यालयाने आवश्यक ती परवानगी द्यावी.
२. सदर वर्गासाठी अध्यापकाची किमान शैक्षणिक पात्रता बी.लिब असावी. विभाग प्रमुखांनी शैक्षणिक कागदपत्रे व अनुभवाचा विचार करुन सदर वर्गासाठी अध्यापकांची निवड करावी.
३. अध्यापकांच्या मानधनासाठी प्रती तासिका रु.७०/- प्रमाणे एकुण २३५ तासिकांसाठी रु.१६,४५०/- (रु.सोळा हजार चारशे पन्नास) फक्त यास कायमस्वरुपी मान्यता व मंजुरी देण्यात येत आहे. मागील वर्षाच्या इतर खर्चाच्या रकमा विचारात घेवुन विभाग प्रमुखांनी आपल्या अधिकार कक्षेत आवश्यकते नुसार इतर खर्चाच्या रकमेस मान्यता व मंजुरी द्यावी.
४. अध्यापकांच्या मानधनाची रक्कम वगळून इतर आवश्यक रक्कम "लोन्स अँण्ड ॲडव्हान्स" म्हणुन काढण्यास कामगार कल्याण अधिकारी यांना परवानगी देण्यात येत आहे.

५. वर्ग सुरु करतानाचे नियम व अटी पुढीलप्रमाणे.

- **शैक्षणिक पात्रता** : प्रशिक्षणार्थी किमान १० वी उत्तीर्ण असावा.
- **शुल्क** : कामगार रु.५००/-, कामगार कुटुंबिय रु.६००/- आणि इतर रु.८००/- व केंद्र समासद शुल्क तसेच तालिकिकरण वही शुल्क रु.६५/- मंडळात जमा करावे. सवलतीचे शुल्क मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार घ्यावे.
- **रिपिटर विद्यार्थ्यांसाठी** : परिक्षा शुल्क रु.१००/- आकारावे. प्रवेश घेतल्यापासुन फक्त ३ वर्षांसाठी पात्र असेल.
- **वर्गाचा पट** : किमान २५ ते ५० असावा. कामगार व कामगार कुटुंबियांना प्राधान्य देण्यात यावे.
- **वर्ग कालावधी व वेळ** : दरवर्षी माहे जुलै / ऑगस्ट मध्ये वर्ग सुरु करावेत. वर्गाची वेळ नियमित कार्यालयीन दिवशी सायं.६.१५ ते ७.१५ अशी असावी.
- **वर्गाची माहिती** : वर्ग सुरु झाल्याचा दिनांक, विद्यार्थी तपशिल (कामगार, कामगार कुटुंबीय इतर) आदी सर्व माहिती मध्यवर्ती कार्यालयास वर्ग सुरु झाल्यापासून १५ दिवसांच्या आत **<u>प्रपत्र अ</u>** नुसार सादर करावी.
- **विद्यार्थ्यांच्या नावांची कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करुनच मध्यवर्ती कार्यालयास पाठवावीत. <u>आडनाव, विद्यार्थ्याचे नाव व पालकाचे नाव या क्रमाने</u>** विद्यार्थ्याचे नाव कळवावे.
- **हजेरी** : परिक्षेपुर्वी संबंधीत विद्यार्थ्याची किमान ८० % उपस्थिती असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी हजेरी असलेले विद्यार्थी परिक्षेसाठी पात्र नाहीत. वैद्यकीय अथवा अन्य अपरीहार्य कारणास्तव विद्यार्थ्याची उपस्थिती कमी भरली असल्यास परिस्थितीनुरुप संबंधीत विभाग प्रमुखांनी उचित निर्णय घ्यावा.
- **वह्यांचे गुण** : परिक्षेपुर्वी विद्यार्थ्यांचे ग्रंथ वर्गीकरण व तालिकीकरण या विषयाच्या वह्या संबंधीत शिक्षकांकडून तपासणी करुन घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याचे गुण मध्यवर्ती कार्यालयास कळविण्यात यावे. याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची असेल.
- तसेच परीक्षेपुर्वी नियमित व रिपिटर विद्यार्थ्यांची तपशिलवार माहिती सोबत जोडलेल्या **<u>प्रपत्र ब</u>** नुसार माहे नोव्हेंबर अखेरपर्यंत सादर करावी.
- सदर वर्गाच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका मध्यवर्ती कार्यालयातुन पुरवल्या जातील.
- **दिव्यांग विद्यार्थी** : किमान ४० % विकलांगत्व असलेल्या दिव्यांग विदयार्थ्यास खालीलप्रमाणे विशेष सवलत देण्यात यावी. त्यासाठी विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
    - ✓ सर्व प्रकारच्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ

देय राहील.

- ✓ त्यांना स्पेलिंग, व्याकरण, विरामचिन्हे याबाबतीत गुणदान कमी करण्यात येणार नाहीत.
- ✓ वर्गात ८०% उपस्थितीची अट लागू नसेल.
- ✓ दिव्यांग विद्यार्थ्यांस परिक्षेच्या किमान १५ दिवसांपुर्वी लेखनिकाची संपुर्ण माहिती व फोटोसह संबंधीत कामगार कल्याण अधिकाऱ्यांकडे ग्रंथालय कर्मचारी / केंद्र संचालक यांच्यामार्फत विनंती अर्ज करता येईल. संबंधित कामगार कल्याण अधिका-याने अर्जाची पडताळणी करुन आपल्या स्तरावर सदर विद्यार्थ्यास लेखी परवानगी द्यावी.
- ✓ अधिक माहितीसाठी शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१५/११९-अ/एसडी-६ दिनांक १५.२.२०१६ व शासन निर्णय संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३ दि.४.३.२०१७ यातील मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करावा.

चालू आर्थिक वर्षापासून **पुढील आदेश निघेपर्यंत** सदर परिपत्रक लागू राहील. दरवर्षी नव्याने परिपत्रक जारी करण्यात येणार नाही. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार संबंधित विभाग प्रमुख /गट प्रमुख / केंद्र प्रमुख यांनी आवश्यक त्या उपाय योजना करुन दरवर्षी माहे जुलै ते ऑगस्ट दरम्यान सदर वर्ग सुरु होतील, याची काळजी घ्यावी.

कल्याण आयुक्त

प्रत,

१. सर्व अधिकारी, म.का.मुंबई
२. सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये / कामगार क्रीडा भवन, मुंबई
३. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
४. संबंधित कल्याण निरीक्षक /केंद्र संचालक /गंथालय सहायक
५. दप्तरी प्रत

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांनी चालविलेल्या "ग्रंथपालन प्रमाणपत्र" अभ्यासक्रमास शासन मान्यता देण्याबाबत..

---

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक:एलआरवाय १०९१/१५४७८०/(२५३४)संस्कृती-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १९ ऑगस्ट,१९९१

वाचा : १) शासन निर्णय,शिक्षण विभाग,क्रमांक:एलआरवाय २५७१/ अ-२, दिनांक १२ मार्च,१९७३

२) शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई यांचे पत्र क्रमांक:शिनि/(ग्रं)/मानप-३/१८८२, दिनांक २८.८.१९९१

३) ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक: २२/०४/५/४३९२, दिनांक २९.७.१९९१

शासन निर्णय :- महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेतर्फे चालविण्यात येणाऱ्या ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमास मान्यता देण्याचा व हा अभ्यासक्रम ग्रंथालय संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या "ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा" अभ्यासक्रमाशी समकक्ष समजण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत तांत्रिक आशय (कालावधी, प्रवेश कार्यक्रम, विषयांची यादी,परीक्षा पद्धती इ.बाबी) लक्षात घेऊन या अभ्यासक्रमास मान्यता देण्यास व तो ग्रंथालय संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या "ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा" अभ्यासक्रमाशी समकक्ष समजण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दी. अ. काकेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे

प्रपत्र "अ"

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र शिक्षण वर्ग विद्यार्थ्यांची प्रवेश माहिती

### नियमित विद्यार्थ्यांची माहिती

| अनु. | विद्यार्थ्याचे नाव – शालेय प्रमाणपत्रानुसार (आडनाव- विद्यार्थ्याचे नाव-वडिलांचे नाव) | वर्गवारी का/का.कु./इतर | सभासद क्र. | केंद्रात शुल्क जमा केल्याची माहिती | | | गट पावती क्र./ दिनांक | दिव्यांग (असल्यास) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | निधी पा.क्र. | दिनांक | | |

### रिपिटर विद्यार्थ्यांची माहिती

| अनु. | विद्यार्थ्याचे नाव – शालेय प्रमाणपत्रानुसार (आडनाव- विद्यार्थ्याचे नाव-वडिलांचे नाव) | वर्गवारी का/का.कु./इतर | सभासद क्र. | केंद्रात शुल्क जमा केल्याची माहिती | | | गट पावती क्र./ दिनांक | प्रथम प्रवेश माहिती वर्ष / सभासद क्र. / दिनांक | परिक्षेसाठीचे विषय | दिव्यांग (असल्यास) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | निधी पा.क्र. | दिनांक | | | | |

## एकुण प्रवेश सामाईक तक्ता

| तपशील | कामगार | कामगार कुटुंबिय | इतर | एकुण विद्यार्थी | एकुण जमा निधी शुल्क | एकुण विद्यार्थ्यांपैकी दिव्यांग विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| नियमित विद्यार्थी | | | | | | |
| रिपिटर विद्यार्थी | | | | | | |
| एकुण | | | | | | |

प्रपत्र "ब"

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

### शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र शिक्षण वर्ग विद्यार्थ्यांची परिक्षेसाठीची माहिती

| अनु. | विद्यार्थ्याचे नाव – शालेय प्रमाणपत्रानुसार (आडनाव- विद्यार्थ्याचे नाव-वडिलांचे नाव) | वर्गवारी का/का.कु./इतर | सभासद क्र. | परिक्षेसाठी नियोजित आसन क्रमांक | केवळ रिपिटर विद्यार्थ्यांसाठी – परिक्षेसाठीचे विषय | दिव्यांग विद्यार्थ्यांने लेखनिक परवानगी घेतल्यास – लेखनिकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियमित विद्यार्थ्यांची माहिती | | | | | |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| | रिपिटर विद्यार्थ्यांची माहिती | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |

### मध्यवर्ती कार्यालयाकडुन परिक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य

| तपशील | ग्रंथालय संघटन | ग्रंथालय व्यवस्थापन | वर्गीकरण तात्विक | तालिकिकरण तात्विक | संदर्भ सेवा | वर्गीकरण प्रात्यक्षिक | तालिकिकरण प्रात्यक्षिक | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्नपत्रिका | | | | | | | | |
| उत्तरपत्रिका संच | | | | | | | | |
| पुरवणी संच | | | | | | | | |
| एकुण | | | | | | | | |